Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ४९] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर ४-१०, २०२५/अग्रहायण १३-१९, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितींची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. | **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ. केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-५ | | |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३७९.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ ची अधिसूचना**

क्रमांक कावि-स.म.अ.-भू सं-मौ.शेगांव-२,ता.शेगाव-११७७-२०२५.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या बुलढाणा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक-६२४/२०२५,

दिनांक २ एप्रिल, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, बुलढाणा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी “पुनर्वसाहत क्षेत्र” म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, खामगांव यांस पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक एल.ए.क्यु.०७-शेगांव-२-२०२४-२५, मौजे - शेगांव भाग-२, ता. शेगांव, जिल्हा - बुलढाणा.

| अ. क्र. | गट क्रमांक | भूधारकांचे नाव | लागवडयोग्य क्षेत्र | पोट खराब क्षेत्र | एकूण क्षेत्र | प्रस्तावा नुसार क्षेत्र | प्रत्यक्ष मोजणी अंती संपादन करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | हे. आर | हे. आर | हे. आर | हे. आर | हे. आर |
| १ | ४५०/१पै | विजय प्रल्हाद घाटोळ व विनोद प्रल्हाद घाटोळ सामाईक | १ ४६ | ० | १ ४६ | १ ४६ | १ ४६ |
| २ | ४५०/१पै | विलास प्रल्हाद घाटोळ | ० ८७ | ० | ० ८७ | ० ८७ | ० ८७ |
| ३ | ४४९/१/ब | अ. मजीद अली महमद | ० ९५ | ० | ० ९५ | ० १२ | ० १२ |
| ४ | ४४९/१ | रामकृष्ण नामदेव टवरे व दत्ता नामदेव टवरे | १ २५ | ० | १ २५ | ० १५ | ० १५ |
| ५ | ४४९/१/अ | रामकृष्ण नामदेव टवरे व दत्ता नामदेव टवरे | ० १२ | ० | ० १२ | ० ०१ | ० ०१ |
| ६ | ४४९/१/अ | व्यवस्थापकीय विश्वस्त श्री गजानन महाराज संस्थान शेगांव (पब्लीक ट्रस्ट रजि. नं. अ २५० बुलढाणा) | ० ८० | ० | ० ८० | ० १० | ० १० |

**अनुसूची-एक**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | हे. आर | हे. आर | हे. आर | हे. आर | हे. आर |
| ७ | ४४९/२ | भरत शरदकुमार डांगरा | १ ८७ | ० ०३ | १ ९० | ० २३ | ० २३ |
| | | | | | एकुण .. | **२ ९४** | **२ ९४** |

**एकुण संपादन क्षेत्र :-** **२.९४ हे. आर**

**संपादनाचे प्रयोजन :-** जिगांव प्रकल्पाअंतर्गत उपसा सिंचन योजना क्र. ७ टप्पा क्र. १ ब च्या स्वयंचलित दाबयुक्त बंदिस्त नलिका वितरण प्रणाली (PDN) च्या पंपगृह व पोचरस्त्याच्या बांधकामा करिता मौजे शेगांव भाग-२, ता. शेगांव, जि. बुलढाणा येथील भूसंपादन प्रस्ताव.

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव :- जिगांव प्रकल्प, ता. नांदुरा.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- जिगांव प्रकल्पाअंतर्गत उपसा सिंचन योजना क्र. ७ टप्पा क्र. १ ब च्या स्वयंचलित दाबयुक्त बंदिस्त नलिका वितरण प्रणाली (PDN) च्या पंपगृह व पोचरस्त्याच्या बांधकामा करिता मौजे शेगांव भाग-२, ता. शेगांव, जि. बुलढाणा येथील भूसंपादन प्रस्ताव.

समाजाला मिळणारे लाभ :- जिगांव प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणी पुरवठा, उद्योग धंद्यांना पाणी पुरवठा होणार आहे. त्याच बरोबर ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन, शेत मजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) मध्ये सुधारणा होणार आहे.

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

**गांव** :- शेगांव भाग-२, तालुका - शेगांव, जिल्हा - बुलढाणा.

**बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** सदरचा प्रकल्प हा विदर्भ सिंचनाचा अनुशेष दुर करण्यासाठी आवश्यक असून दुष्काळ प्रवण भागातील अतिशय कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नाही. तसेच, कोणतीही व्यक्ती विस्थापित होत नाही, त्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची-चार**

**सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश**

भारत सरकार, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक जे १२०११-२२-२००७-१अ.१, दिनांक ११ मे, २००७ अन्वये जिगांव या मोठ्या सिंचन प्रकल्पाला पर्यावरण विषयक सर्वेक्षण मंजुरी प्रदान करण्यात आलेली असल्याने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६ पोटकलम (२) मधील परंतुकानुसार सामाजिक आघात निर्धारणाशी संबंधित असणाऱ्या तरतुदी या प्रकल्पाला लागू होत नाहीत.

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे अभिलेख उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, खामगांव यांचे कार्यालयामधून निरीक्षण करता येईल.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३८०.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ ची अधिसूचना**

क्रमांक-स.म.अ.-भूसंपादन-कावि.-२६९०-२०२५.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या बुलढाणा जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना क्रमांक ३१२६, दिनांक ८ ऑगस्ट, २०२३ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, बुलढाणा जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मलकापुर यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक एल.ए.क्यु.०१-मामुलवाडी २०२२-२३, गांव : मामुलवाडी, तालुका : मलकापुर, जिल्हा - बुलढाणा.

| अ. क्र. | गावाचे नांव | कलम ११ नुसार संपादित क्षेत्र | | कलम १९ नुसार संपादित करण्याचे क्षेत्र | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | गट क्रमांक | संपादन क्षेत्र | गट क्रमांक | संपादन क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | हे. आर | | हे. आर | |
| १ | धाडी | ६२ | ० ०० | ६२ | ० ०३ | कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव याचे पत्र क्र.जा. क्र. ३००४-रेशा-३-मामुलवाडी-रस्ता-२०२५, दिनांक १४ जूलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये एकूण ५२ भूधारकांची ४.४६ हे. आर. जमीन सरळ खरेदीकरीता मंजुरात मिळालेली आहे. आजपावेतो ४७ भूधारकांची ४.१४ हे. आर जमीन सरळ खरेदीने संपादित करण्यात आलेली असून उर्वरित ०.३२ हे. आर क्षेत्राची खरेदी करणे शक्य होणार नसल्याने सुधारित संयुक्त मोजणी अहवालानुसार ५.०५ हे. आर क्षेत्रापैकी ४.१४ हे. आर वगळून उर्वरित ०.९१ हे. आर चा भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत नमूद केले आहे. |
| २ | धाडी | ६४ | ० ६० | ६४ | ० ४५ | |
| ३ | धाडी | ६६ | ० १२ | ६६ | ० १० | |
| ४ | खुमगांव | ६२/१ | ० ०४ | ६२ | ० ०४ | |
| ५ | खुमगांव | १०९ | ० ०४ | १०९ | ० ०२ | |
| ६ | खुमगांव | ११० | ० ०६ | ११० | ० ०६ | |
| ७ | खुमगांव | ११९ | ० २० | ११९ | ० २० | |
| ८ | खुमगांव | १२५/ १२५/२ | १ ०६ | १२५/ १२५/२ | ० ०१ | |
| | **एकूण संपादित करावयाचे क्षेत्र ० ९० हे. आर ..** | | | | ० ९१ | |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :- | मौजे मामुलवाडी नविन गावठाण (पुनर्वसन) ते खुमगांव रेल्वे स्टेशन, ता. नांदुरा पोच रस्त्यासाठी. |
| प्रकल्पाचे वर्णन | :- | मौजे मामुलवाडी नविन गावठाण (पुनर्वसन) ते खुमगांव रेल्वे स्टेशन, ता. नांदुरा पोच रस्त्याकरीता खाजगी जमिनीचा ०.९१ हे. आर क्षेत्र भूसंपादन करणेबाबत. |
| समाजाला मिळणारे लाभ | :- | या प्रकल्पामुळे मौजे मामुलवाडी नविन गावठाण (पुनर्वसन) ते खुमगांव रेल्वे स्टेशन, येथील पोच रस्त्यामुळे स्थानिक गावकऱ्यांना शेतीमशागत व दळणवळणाच्या दृष्टीने फायदा मिळेल. |

## अनुसूची-तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

– निरंक–

## अनुसूची-चार

### पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

– निरंक –

**टीप :-** उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी कार्यालय, मलकापुर येथे पाहता/ निरीक्षण करता येईल.

बुलढाणा :
दिनांक १० नोव्हेंबर, २०२५.

**डॉ. किरण पाटील,**
जिल्हाधिकारी, बुलढाणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.